पृष्ठांकन क्र. तंशि/विकाना/तांशा/२०२४/2056
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक
दिनांक:- 28 AUG 2024

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित,
पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक शहर अंतर्गत असलेल्या सर्व संस्था

२/- त्यांना कळविण्यात येते की, उपव्यवस्थापकीय संचालक, सारथी, विभागीय कार्यालय,नाशिक तथा उपजिल्हाधिकारी, कार्यालय नाशिक यांचे पत्रानुसार मातोश्री मुलींचे वसतिगृह, नाशिक येथे विदयार्थीनीच्या सन २०२४-२५ च्या प्रवेशासाठी सारथी संस्थेंतर्गत सदर ठिकाणी मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा कुणबी लक्षित गटातील विदयार्थीनींना तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विदयार्थीनींना प्रवेश देण्यात येत असून सदर प्रवेश निश्चितीसाठी दि.१२.०९.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. करिता सदर जाहिरात आपल्या संस्थेच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावी. सोबत संदर्भिय पत्र.

(अमोल विनायक न्यायनित)
सहा.संचालक(तां)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

प्रत-प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

F:\tasha folder\Rajani Folder 2024\Forward, Endosment\Forward.doc

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व
मानव विकास संस्था (सारथी), पुणे - विभागीय कार्यालय, नाशिक
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
पत्ता : बॅरॅक नं. ८, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिकरोड, नाशिक - ४२२१०१.
Email : divnashiksarthi@gmail.com दूरध्वनी क्र. : ०२५३-२९९३६८९

जा. क्र. सारथी/मातोश्री वसतिगृह/२०२४/७६५ दि. २८/०८/२०२४

प्रति,

१. विभागीय सहसंचालक
पुणे, विभाग, पुणे. (उच्च शिक्षण).

२. विभागीय सहसंचालक
नाशिक, विभाग, नाशिक. (तंत्र शिक्षण).

विषय : मातोश्री मुलींचे वसतिगृह, नाशिक येथे विद्यार्थीनींच्या सन २०२४-२५ च्या प्रवेशासाठीची जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. सारथी/मातोश्री वसतिगृह/२०२४/७४१, दि. ०९/०८/२०२४.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) या महामंडळांकडून त्यांच्या लक्षित गटातील प्रत्येकी ७५ विद्यार्थीनींना व उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ५० विद्यार्थीनींना अश्या एकूण २०० विद्यार्थीनींना सरस्वती नगर, धात्रक फाटा, पंचवटी, नाशिक — ४२२००३ येथे प्रत्यक्ष प्रवेश देणेस सुरुवात करणेत आलेली आहे.

**सारथी संस्थेंतर्गत सदर ठिकाणी मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या लक्षित गटातील विद्यार्थीनींना तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थीनींना प्रवेश देणेत येत आहे.**

यापूर्वी विद्यार्थीनींनी दि. २०/०८/२०२४ पर्यंत आपला प्रवेश निश्चित करणेबाबतची जाहिरात प्रसिद्ध करणेत आली होती. सदर जाहिरात आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत संदर्भीय पत्रान्वये या कार्यालकडून विनंती करणेत आली होती.

मातोश्री मुलींचे वसतिगृह, नाशिक येथे प्रवेश निश्चितीसाठी विद्यार्थीनींकडून पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने दि. १२/०९/२०२४ पर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे.

या पत्रासोबत मातोश्री मुलींचे वसतिगृह, नाशिक येथील प्रवेशासाठीच्या मुदतवाढ जाहिरातीचा नमूना जोडणेत आलेला असून आपले अधिनस्त महाविद्यालयातील नोटीस बोर्डवर सदर जाहिरात प्रसिद्ध होणेबाबत सहकार्य व्हावे हि विनंती.

सदर मुदतवाढ जाहिरात सारथी, पुणे यांचे संकेतस्थळावर प्रकाशित झाली आहे. त्याचप्रमाणे सदर मुदतवाढ जाहिरात आपल्या संकेतस्थळावर देखील प्रकाशित झाल्यास लक्षित गटातील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थीनींना याचा लाभ घेता येईल.

Nirmal

**(पल्लवी निर्मळ)**
उपव्यवस्थापकीय संचालक,
सारथी, विभागीय कार्यालय, नाशिक तथा
उपजिल्हाधिकारी (भुसंपादन क्र. २), नाशिक.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :

१. मा. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे.
२. मा. व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर.

**जिल्हाधिकारी, नाशिक व छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जाहिरात**

## मुदतवाढ जाहिरात

शासन निर्णय क्रमांक : वसति ५३१७ /प्र.क्र.९/मशि-२ दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ अन्वये मातोश्री मुलींचे शासकीय वसतिगृह, सरस्वती नगर, धात्रक फाटा, पंचवटी, नाशिक, येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यामार्फत मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा लक्षित गटातील ७५ मुलींसाठी व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर यामार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग गटातील ७५ मुलींसाठी तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ५० मुलींसाठी अशाप्रकारे लक्षित घटकातील एकूण २०० विद्यार्थीनींसाठी वसतिगृह सुरू करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ या वर्षाकरीता मातोश्री मुलींचे वसतिगृह, सरस्वती नगर, धात्रक फाटा, पंचवटी, नाशिक येथील विद्यार्थिनीच्या वसतिगृह प्रवेश जाहिरात सारथी मुख्य कार्यालय, पुणे यांचे संकेतस्थळावर दि. ०६/०८/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आली होती. त्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज करणेसाठी दि. १२/०९/२०२४ पर्यंत मुदत वाढविणेत येत आहे. रिक्त जागांच्या प्रवेशाकरीता अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या (अपवाद पदविका परीक्षा उत्तीर्ण होऊन पदविसाठी प्रवेश घेतलेल्या द्वितीय वर्षाच्या) विद्यार्थिनींसाठी खालील प्रमाणे रिक्त जागांच्या तपशीलानुसार जाहिरात प्रसिध्द करणेत येत असून सदर संख्या ही कमी-जास्त होऊ शकेल.

**मातोश्री शासकीय २०० मुलींचे वसतिगृहामध्ये अभ्यासक्रमनिहाय प्रवेशासाठीची संख्या खालीलप्रमाणे राहिल.**

| मातोश्री मुलींचे वसतिगृह, नाशिक येथील सारथीच्या ७५ व उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत ५० विद्यार्थीनींसाठी प्रवेशासाठीची संख्या खालीलप्रमाणे : | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | अभ्यासक्रम | सारथी मार्फत वसतिगृहासाठी मुलींची संख्या : ७५ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत वसतिगृहासाठी मुलींची संख्या : ५० |
| १ | व्यवसायिक पदवी | ५२ | उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्राप्त निर्देशानुसार ही ५० विद्यार्थिनींची अभ्यासक्रमनिहाय विगतवारी यादी निश्चित करण्यात येईल. |
| २ | बिगर व्यवसायिक पदवी | १२ | |
| ३ | पदव्युत्तर पदवी | ११ | |
| ४ | प्रत्यक्ष प्रवेश निश्चित | ३४ | ०५ |
| ५ | रिक्त जागा | ४१ | ४५ |

**सदर पदांना आरक्षणाचे प्रचलित शासन धोरण लागू राहील.**

सारथी व उच्च व तंत्र शिक्षण विभागातील विद्यार्थिनीच्या प्रवेशासाठीचे आवश्यक निकष, अटी व शर्ती संकेतस्थळावर उपलब्ध असून अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ दि.१२/०९/२०२४ पर्यंत राहील.

Scanned with OKEN Scanner

## सारथी विभागीय कार्यालय

पत्ता – बॅरेक क्र. ८, विभागीय आयुक्त कार्यालय आवार नाशिकरोड, नाशिक, पिन कोड – ४२२ १०१.
संपर्क : फोन नं- ०२५३-२९९३६८९
ई-मेल : divnashiksarthi@gmail.com.
संकेतस्थळ : https://sarthi- maharashtragov.in/

सदरची जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून व त्यासोबत आवश्यक कागदपत्रे स्व-साक्षांकित करून पोस्टाद्वारे / प्रत्यक्ष सारथी संस्थेचे नाशिक येथील वरील पत्यावर दिनांक १३/०९/२०२४ पावेतो सादर करावेत.

टीप :

१. वसतिगृह लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनी शासनाच्या इतर वसतिगृहाच्या योजनेचा दुहेरी आर्थिक लाभ घेतलेला नसावा.
२. वसतिगृहात प्रवेश देण्यात येणाऱ्या पात्र मुलींची यादी सबंधित सारथी / उच्च व तंत्र शिक्षणविभाग यांनी कागदपत्रांची पडताळणी करुन अंतिम केल्यानंतर सारथीचे संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
३. पात्र विद्यार्थिनींना वसतिगृहात प्रत्यक्ष दाखल (हजर) होण्याचा दिनांक स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**उपरोक्त प्रवेशाच्या जागा व धोरणांमध्ये बदल करणेचा अधिकार मा. उपव्यवस्थापकीय संचालक, सारथी, विभागीय कार्यालय, नाशिक यांचा असेल.**

दि. २१/०८/२०२४
ठिकाण : नाशिक

(पल्लवी निर्मळ)
उपव्यवस्थापकीय संचालक,
सारथी, विभागीय कार्यालय, नाशिक तथा
उपजिल्हाधिकारी (भुसंपादन क्र.२), नाशिक